# नाशिक महानगरपालिका, नाशिक

सामान्य प्रशासन विभाग

राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक - 422002

जा.क्र.आस्था/वशि/कार्या-09/46/2026 दिनांक 05/06/2026

## -: प्रसिध्दीपत्रक :-

नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-क अभियांत्रिकी संवर्गातील 114 रिक्त पदे सरळसेवा भरती प्रक्रियेद्वारे भरण्यासाठी जाहिरात क्र. 01/2025, दि. 29/10/2025 रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर जाहिरातीनुसार विविध अभियांत्रिकी संवर्गातील एकूण 114 पदांसाठी ऑनलाईन परीक्षा दि. 24/02/2026 व 25/02/2026 रोजी महाराष्ट्र राज्यातील 13 शहरांमध्ये टी.सी.एस. आय.ओ.एन. मार्फत घेण्यात आली.

| अ.क्र. | पदनाम | वर्ग | 7 व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | पद संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | सहाय्यक अभियंता (विद्युत) | क | S-15, 41800-132300 | 3 |
| 2 | सहाय्यक अभियंता (स्थापत्य) | क | S-15, 41800-132300 | 15 |
| 3 | सहाय्यक अभियंता (यांत्रिकी) | क | S-15, 41800-132300 | 4 |
| 4 | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | क | S-14, 38600-122800 | 7 |
| 5 | कनिष्ठ अभियंता(स्थापत्य) | क | S-14, 38600-122800 | 46 |
| 6 | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | क | S-14, 38600-122800 | 9 |
| 7 | कनिष्ठ अभियंता (वाहतुक) | क | S-14, 38600-122800 | 3 |
| 8 | सहाय्यक कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | क | S-10, 29200-92300 | 24 |
| 9 | सहाय्यक कनिष्ठ अभियंता (विद्युत) | क | S-10, 29200-92300 | 3 |

सदर ऑनलाईन परीक्षेमध्ये उमेदवारांना प्राप्त गुण, सामाजिक व समांतर आरक्षण तसेच समान गुण प्राप्त झालेल्या उमेदवारांची प्राधान्यक्रमवारी विचारात घेऊन एकूण 114 पदांपैकी 110 उमेदवारांची निवड यादी, प्रतीक्षा यादी व गुणवत्ता यादी (Merit List) दि. 02/04/2026 रोजी नाशिक महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. संबंधित उमेदवारांची निवड ही दस्तऐवज पडताळणी, पूर्व चारित्र्य पडताळणी व इतर लागू अटींच्या अधीन राहून करण्यात आली आहे.

भरती प्रक्रियेअंतर्गत उमेदवारांच्या कागदपत्रांची छाननी करण्यासाठी जा.क्र. आस्था/वशि/कार्या-09/25/2026, दि. 15/04/2026 अन्वये छाननी निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार गुणवत्ता यादीमध्ये स्थान प्राप्त केलेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची सविस्तर तपासणी करण्यात आली.

छाननी प्रक्रियेदरम्यान उमेदवारांनी सादर केलेली शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, अनुभव प्रमाणपत्रे, नियुक्ती आदेश, वेतनाचा पुरावा म्हणून बँक खाते विवरणपत्रे (Bank Statements), भविष्य निर्वाह निधी (PF) नोंदी, तसेच इतर आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली.

तपासणीदरम्यान असे निदर्शनास आले की, काही उमेदवारांनी दावा केलेल्या अनुभव कालावधीसंदर्भातील आवश्यक व पडताळणीयोग्य पुरावे सादर केलेले नाहीत. काही प्रकरणांमध्ये उमेदवारांनी तासिका तत्त्वावरील सेवा दर्शविलेली असून त्यासंबंधित आवश्यक पुरावे उपलब्ध नव्हते. तसेच बँक खाते विवरणपत्रे, पी.एफ. नोंदी, वेतन पडताळणी कागदपत्रे, ठेकेदार म्हणून केलेल्या कामांच्या वर्क ऑर्डर्स, काम पूर्णत्व प्रमाणपत्रे, आयकर विवरणपत्रे, घोषणापत्रे इत्यादी आवश्यक कागदपत्रे अनेक प्रकरणांमध्ये अपूर्ण अथवा अनुपलब्ध आढळून आली. काही उमेदवार दस्तऐवज पडताळणीस अनुपस्थित राहिले.

कर्मचारी निवड समितीने प्रत्येक प्रकरणाचा स्वतंत्रपणे विचार करून सादर कागदपत्रांच्या आधारे उमेदवारांची पात्रता निश्चित केली. त्यानुसार एकूण 110 उमेदवारांच्या कागदपत्रांची छाननी करण्यात आली असून त्यापैकी 53 उमेदवार आवश्यक कागदपत्रांसह तात्पुरते पात्र आढळून आले आहेत. उर्वरित 57 उमेदवारांच्या बाबतीत आवश्यक कागदपत्रे अपूर्ण, अपुरे किंवा पडताळणीयोग्य पुरावे उपलब्ध नसल्यामुळे त्यांना तात्पुरते अपात्र ठरविण्यात आले आहे.

जे उमेदवार तात्पुरते पात्र ठरविण्यात आले आहेत, त्यांच्या बाबतीत भविष्यात सादर केलेली कागदपत्रे खोटी, दिशाभूल करणारी अथवा नियमबाह्य असल्याचे आढळून आल्यास, अथवा कोणत्याही हरकतीच्या अनुषंगाने संबंधित बाब सिद्ध झाल्यास, त्यांची निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

तथापि, नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचा विचार करून कर्मचारी निवड समितीने तात्पुरते अपात्र ठरविण्यात आलेल्या 57 उमेदवारांना अंतिम संधी प्रदान करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार संबंधित उमेदवारांना स्वतंत्र पत्राद्वारे अपात्रतेची कारणे कळविण्यात येणार आहेत.

सदर पत्रामध्ये नमूद करण्यात आलेल्या कारणांबाबत संबंधित उमेदवारांकडे अन्य कोणतेही सक्षम, ग्राह्य व पडताळणीयोग्य पुरावे अथवा लेखी म्हणणे असल्यास त्यांनी ते आवश्यक पुराव्यांसह दि. 15/06/2026 पर्यंत सामान्य प्रशासन विभाग, राजीव गांधी भवन, नाशिक महानगरपालिका येथे सादर करावे. तसेच ज्या उमेदवारांना त्यांचे तोंडी म्हणणे मांडावयाचे आहे, त्यांनी दि. 15/06/2026 रोजी सकाळी 11.00 वाजता अध्यक्ष तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांच्यासमोर समक्ष उपस्थित राहून लेखी निवेदनासह आवश्यक पुरावे सादर करावेत. विहित मुदतीत लेखी म्हणणे अथवा आवश्यक पुरावे सादर न केल्यास किंवा निर्धारित दिनांक व वेळेस समक्ष उपस्थित राहून म्हणणे मांडले नाही, तर उपलब्ध अभिलेखांच्या आधारे अंतिम निर्णय घेण्यात येईल. अशा परिस्थितीत यापुढे कोणतीही स्वतंत्र संधी अथवा पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.विहित मुदतीत आवश्यक कागदपत्रे अथवा समाधानकारक पुरावे सादर न केल्यास संबंधित उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याऐवजी प्रतीक्षा यादीतील पात्र उमेदवारांना नियमानुसार संधी देण्यात येईल.

तसेच जे उमेदवार कागदपत्र पडताळणीच्या दिवशी अनुपस्थित राहिले असून अद्यापपर्यंत पडताळणीसाठी हजर झालेले नाहीत, त्यांची निवड रद्द करून त्यांच्या जागी प्रतीक्षा यादीतील पात्र उमेदवारांना गुणवत्तेनुसार संधी देण्यात येईल.

अभियांत्रिकी पदांसाठी लागू पात्रता निकष, दस्तऐवज पडताळणी प्रक्रिया व शासनाच्या लागू आदेशांच्या अधीन राहून तात्पुरते पात्र व तात्पुरते अपात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी नाशिक महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-
मनिषा खत्री, भाप्रसे
आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक